अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०९/१०/२०२४

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३५३/२०२४, एन.आर.आय. सागरी पोलीस ठाणे, नवीमुंबई |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. सतीश संभाजी कदम, वय ५५ वर्ष, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेमणुक - एन.आर.आय. सागरी पोलीस ठाणे, नवीमुंबई |
| लाचेची मागणी | रू. ५,००,०००/- तडजोडीअंती रू. ४,००,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रू. ३,५०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे वडीलांचे विरूध्द एन.आर.आय सागरी पोलीस ठाणे, नवीमुंबई येथे इमारत पडली म्हणून गुन्हा दाखल असून नमूद गुन्हयात त्यांना अटक करण्यात आली होती. सद्या तक्रारदार यांचे वडील तळोजा कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहेत. नमूद गुन्हयामध्ये मदत करण्याकरीता व जामीन मिळवून देण्याकरीता लोकसेवक श्री. सतीश संभाजी कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एन.आर.आय. सागरी पोलीस ठाणे, नवीमुंबई यांनी तक्रारदार यांना प्रथम रू. १२ लाख व त्यानंतर रू. २ लाख अशी रक्कमेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून यापुर्वीच स्विकारली होती. त्यानंतर पुन्हा दिनांक ०२/१०/२०२४ रोजी तक्रारदार यांचे वडीलांचे विरूध्द एन.आर.आय. सागरी पोलीस ठाणे, नवीमुंबई येथे फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानुसार लोकसेवक यांनी नमूद गुन्हयात तक्रारदार यांचे वडीलांचा ताबा न घेण्याकरीता, अटक न करण्याकरीता व गुन्हयात मदत करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे रोख रक्कम रू. ५,००,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०८/१०/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून सदर कारवाई ला. प्र.वि., मुंबई विभागाने करावी अशी विनंती करून लोकसेवकाविरूध्द लेखी तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०८/१०/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती रू. ४,००,०००/- इतक्या रक्कमेची लाच स्वरूपात मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांच्याकडून रू. ३,५०,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री. कृष्णा मेखले, पो.नि. पर्यवेक्षक अधिकारी :- श्रीमती सरिता भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सानप, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
**टोलफ्री क्र.** १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net